**आकाशवाणी पुणे**
**प्रादेशिक वृत्तविभाग**
**राष्ट्रीय बातमीपत्र**
**सकाळी 08 वाजून 30 मिनिटं**

**दिनांकः 25.08.2024** **वारः रविवार**

---

**ठळक बातम्या**

- केंद्रीय कर्मचाऱ्यांसाठी एकीकृत पेन्शन योजना जाहीर; उच्च कार्यक्षमतेच्या जैवनिर्मितीला चालना देण्यासाठी 'BioE3- धोरणाला देखील मान्यता.
- विज्ञान आणि तंत्रज्ञान विभागाच्या तीन एकछत्री योजनांचं 'विज्ञान धारा'मध्ये विलीनीकरण.
- मार्च 2026 पर्यंत देश नक्षलवादापासून मुक्त होईल, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचा विश्वास.
- पंतप्रधान नरेंद्र मोदी सकाळी 11 वाजता आकाशवाणीवरुन करणार 'मन की बात'.
- पॅरिस पॅरालिम्पिकसाठी १० खेळाडूंचा भारतीय पॅरा-शूटिंग संघ रवाना.

आणि

- महाराष्ट्रात अनेक ठिकाणी पावसाची संततधार. जळगाव, धुळे, पुणे, सातारा, अहमदनगर जिल्ह्यांना अतिवृष्टीचा इशारा.

**एकीकृत-पेन्शन**

केंद्रीय मंत्रिमंडळाने सरकारी कर्मचाऱ्यांसाठी हमीपूर्ण एकात्मिक पेन्शन योजनेला मंजुरी दिली आहे. माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी काल मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर नवी दिल्लीत सांगितलं की, या योजनेंतर्गत किमान 25 वर्षे सेवा पूर्ण केलेल्या कर्मचाऱ्यांना अंतिम 12 महिन्यांच्या सरासरी मूळ वेतनाच्या 50 टक्के रक्कम पेन्शन म्हणून दिली जाईल. याशिवाय कर्मचाऱ्याच्या मृत्यूनंतर मिळणारं कौटुंबिक निवृत्ती वेतन साठ टक्के करण्यात आलं आहे. किमान 10 वर्षांच्या सेवेनंतर सेवानिवृत्तीवर, किमान 10,000 रुपये पेन्शनची हमी दिली जाईल. आश्वासित पेन्शन, कौटुंबिक निवृत्ती वेतन आणि किमान पेन्शनवरही महागाई भत्ता देय असेल जो औद्योगिक कामगारांना लागू होणाऱ्या अखिल भारतीय ग्राहक मूल्य निर्देशांकावर आधारित असेल. ग्रॅच्युइटीव्यतिरिक्त, निवृत्तीनंतर एकदंडी रक्कम देखील दिली जाईल. या योजनेचा लाभ सुमारे 23 लाख सरकारी कर्मचाऱ्यांना होणार आहे. पुढील वर्षी १ एप्रिलपासून ही योजना लागू होईल असंही वैष्णव यांनी सांगितलं.

योजनेचं स्वागत करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशाचा गाडा चालविण्यात केंद्र सरकारी कर्मचारी देत असलेल्या योगदानाचं कौतुक केलं. ही योजना सरकारी कर्मचाऱ्यांना सन्मान आणि आर्थिक सुरक्षितता यांची खात्री करणारी असल्याचं मोदी यांनी समाज माध्यमावरील एका संदेशात म्हटलं आहे. तर 32 लाख कर्मचाऱ्यांचं प्रतिनिधीत्व करणाऱ्या संयुक्त सल्लागार यंत्रणेच्या कर्मचारी शिष्टमंडळानं पंतप्रधानांची भेट घेऊन सरकारच्या निर्णयाची प्रशंसा केली. शिष्टमंडळाशी संवाद साधल्याबद्दल कर्मचारी बाजूचे सचिव शिव गोपाल मिश्रा यांनी पंतप्रधानांचे आभार मानले.

मंत्रिमंडळानं उच्च-कार्यक्षमतेच्या जैवउत्पादनाला चालना देण्यासाठी अर्थव्यवस्था, पर्यावरण आणि रोजगाराकरिता Bio E3-जैवतंत्रज्ञान धोरणाला मंजुरी दिली आहे. हे धोरण संशोधन आणि विकास आणि संकल्पनात्मक क्षेत्रांमधील उद्योजकतेसाठी नाविन्यपूर्ण समर्थन प्रदान करेल.

मंत्रिमंडळानं 10 हजार 579 कोटी रुपयांच्या खर्चासह विज्ञान धारा नावाच्या एकात्मिक केंद्रीय क्षेत्रातील योजनेत तीन एकछत्री योजना विलीन करण्यासही मान्यता दिली. या योजनेत विज्ञान आणि तंत्रज्ञान संस्थात्मक आणि

मानवी क्षमता निर्माण, संशोधन आणि विकास, आणि नवोपक्रम, तंत्रज्ञान विकास आणि उपयोजन अशा तीन व्यापक घटकांचा समावेश आहे.

**शहा-नक्षलवाद**

माओवाद्यांविरुद्धचा लढा आता अंतिम टप्प्यात पोहोचला आहे आणि डाव्या विचारसरणीच्या अतिरेकाविरुद्ध निर्णायक आणि धडक मोहीम सुरू करण्याची वेळ आली असल्याचं केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी काल जाहीर केलं. छत्तीसगडच्या दौऱ्यात बातमीदारांशी बोलताना, शाह यांनी आश्वासन दिलं की मार्च 2026 पर्यंत देश नक्षल समस्येपासून पूर्णपणे मुक्त होईल. छत्तीसगड सरकार लवकरच माओवाद्यांना शरण येण्यासाठी नवीन धोरण लागू करेल असंही शहा यांनी जाहीर केलं. डाव्या विचारसरणीचा प्रभाव असलेल्या भागात कायदा आणि सुव्यवस्था प्रस्थापित करण्यासाठी आणि त्या प्रदेशांमध्ये विकासाला गती देण्यासाठी केंद्र सरकारच्या वचनबद्धतेची त्यांनी पुष्टी केली. शहा यांनी रायपूरमध्ये माओवादग्रस्त राज्यांसाठी आंतरराज्य समन्वय समितीची बैठक घेतली. या बैठकीला छत्तीसगडसह सात राज्यांचे मुख्य सचिव आणि पोलीस महासंचालक उपस्थित होते. छत्तीसगड, झारखंड, ओडिशा, मध्य प्रदेश, आंध्र प्रदेश, तेलंगणा आणि महाराष्ट्रातील मुख्य सचिव आणि पोलिस महासंचालकांच्या व्यतिरिक्त, केंद्र आणि राज्य सरकारचे वरिष्ठ अधिकारी या बैठकीत सहभागी झाले होते. गृहमंत्री तीन दिवसांच्या छत्तीसगड दौऱ्यावर आहेत.

**मन की बात**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज आकाशवाणीच्या मन की बात या कार्यक्रमाद्वारे सकाळी अकरा वाजता देशवासियांशी संवाद साधणार आहेत. हा या कार्यक्रमाचा ११३ वा भाग आहे. हा कार्यक्रम आकाशवाणीच्या सर्व केंद्रांवरून आणि दूरदर्शन वाहिनीवरून प्रसारित होईल. newsonair.gov.in हे संकेतस्थळ तसंच न्यूज ऑन एअर या मोबाईल ॲपवरही हा कार्यक्रम प्रसारित केला जाईल. आकाशवाणी आणि दूरदर्शनचे यूट्यूब चॅनल, प्रधानमंत्री कार्यालय आणि माहिती आणि प्रसारण मंत्रालयाच्या यूट्यूब चॅनलवर या कार्यक्रमाचं थेट प्रसारण केलं जाणार आहे. या कार्यक्रमाचा मराठी अनुवाद हिंदी प्रसारणानंतर लगेचच ऐकता येईल.

हे राष्ट्रीय बातमीपत्र आपण आकाशवाणीच्या पुणे केंद्रावरुन ऐकत आहात...

**नासा-स्पेसएक्स मिशन**

NASA चे दोन अंतरिक्षवीर, सुनीता विल्यम्स आणि बॅरी विल्मोर, SpaceX च्या मदतीने पुढील वर्षी फेब्रुवारीमध्ये पृथ्वीवर परततील. सुनिता आणि **ब्यारी बच प्रत्यक्षात** केवळ आठ दिवसांच्या मोहिमेवर होते परंतु त्यांच्या बोईंग स्टारलाइनर अंतराळयानाच्या समस्यांमुळं त्यांना आठ महिने कक्षेत घालवावे लागतील. स्टारलायनर इतर कर्मचाऱ्यांविना पृथ्वीवर परत येईल. अंतरिक्षयानाला पृथ्वीवरुन निघाल्यानंतर प्रवासादरम्यान, हीलियम गळती आणि वाईट कार्य करणारे थ्रस्टर्ससह समस्यांचा सामना करावा लागला.

**पंतप्रधान - महाराष्ट्र**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज महाराष्ट्रातील जळगाव आणि राजस्थानमधील जोधपूरला भेट देणार आहेत. सकाळी मोदी लखपती दीदी संमेलनात सहभागी होण्यासाठी जळगावला जाणार आहेत. एनडीए सरकारच्या तिसऱ्या कार्यकाळात नुकत्याच लखपती झालेल्या 11 लाख नवीन लखपती दीदींना ते प्रमाणपत्र देतील आणि त्यांचा सत्कार करतील. मोदी देशभरातील लखपती दीदींशीही संवाद साधणार आहेत. पंतप्रधान दोन हजार पाचशे कोटी रुपयांचा फिरता निधी जारी करतील. स्वयं-सहायता गटांच्या सुमारे 48 लाख सदस्यांना त्याचा लाभ होणार आहे. ते पाच हजार कोटी रुपयांचं बँक कर्ज देखील वितरित करतील, स्वयं-सहायता गटांच्या सुमारे 26 लाख सदस्यांना

त्याचा लाभ होईल. लखपती दीदी योजना सुरू झाल्यापासून आतापर्यंत एक कोटी महिलांना लखपती दीदी बनवण्यात आलं आहे. सरकारनं तीन कोटी लखपती दीदी बनवण्याचं उद्दिष्ट ठेवलं आहे.
संध्याकाळी पंतप्रधान मोदी राजस्थानमधील जोधपूर इथं पोहोचतील. राजस्थान उच्च न्यायालयाच्या अमृत महोत्सवी समारंभाच्या समारोप समारंभात ते प्रमुख पाहुणे असतील. राजस्थान उच्च न्यायालयाच्या संग्रहालयाचं उद्धाटनही मोदी यांच्या हस्ते होणार आहे.

**नेपाळ-अपघात**

नेपाळ बस दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेल्या २५ जणांचे पार्थिव देह भारतीय वायुसेनेच्या विशेष विमानानं काल महाराष्ट्रातील जळगाव इथं आणण्यात आले. रुग्णवाहिकेतून त्यांच्या मूळ गावी नेण्यात येऊन आवश्यक प्रक्रियेनंतर हे पार्थिव देह त्यांच्या कुटुंबीयांच्या ताब्यात देण्यात आले. जळगावचे पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी सांगितलं की या अपघातात जखमी झालेल्यांवर नेपाळमध्येच रुग्णालयात उपचार सुरू असून त्यातील एकाची प्रकृती गंभीर आहे. पंतप्रधान राष्ट्रीय मदत निधीतून या अपघातातील प्रत्येक मृताच्या नातेवाईकांना 2 लाख रुपये तर जखमींना प्रत्येकी 50 हजार रुपये सानुग्रह मदत स्वरूपात दिले जाणार आहेत.

**स्फोट-जालना**

जालना औद्योगिक वसाहतीमधल्या एका पोलाद कारखान्यात काल लोखंड वितळण्याच्या भट्टीत अचानक स्फोट झाल्यानं 34 कामगार गंभीर तर 15 जण किरकोळ जखमी झाले. या दुर्घटनेत कुठलीही जीवितहानी झाली नाही. जखमी कामगारांवर जालना शहरातल्या एका खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या घटनेची कामगार अधिकाऱ्यांच्या माध्यमातून सविस्तर चौकशी करून दोषींवर कारवाई केली जाईल, असं अप्पर जिल्हाधिकारी रिता मैत्रवार यांनी सांगितलं.

**बॅडमिंटन-आशिया**

भारताची अव्वल कनिष्ठ बॅडमिंटनपटू, तन्वी पात्री हिनं चीनमध्ये चेंगडू इथं आशिया 17 वर्षे आणि 15 वर्षांखालील कनिष्ठ अजिंक्यपद स्पर्धेमध्ये 15 वर्षांखालील मुलींच्या एकेरीच्या अंतिम फेरीत धडक मारली. 17 वर्षांखाली मुलांच्या एकेरीत ज्ञाना दत्तू टीटीला इंडोनेशियाच्या रदिथ्या बायूकडून पराभव पत्करावा लागला. तो कास्यपदकासह मायदेशी परतेल.

**पॅरीस-पॅरा**

भारतीय पॅरा-नेमबाजी संघ पॅरिसमधील पॅरालिम्पिक खेळांसाठी रवाना झाला आहे. 10 खेळाडूंचा समावेश असलेला हा संघ टोकियोमधील पॅरा ऑलिम्पिकमधील आपली कामगिरी आणखी सुधारुन जास्तीत जास्त पदकं मिळविण्यासाठी स्पर्धा करेल.

**हवामान**

महाराष्ट्राच्या विविध भागांमध्ये पावसानं पुन्हा जोर धरला आहे. संततधार पावसामुळं, नद्या, धरणं भरुन वाहू लागल्या आहेत. जनजीवन विस्कळीत झालं आहे. जळगाव, धुळे, पुणे, सातारा,अहमदनगर जिल्ह्यांमध्ये तुरळक ठिकाणी जोराचे वारे आणि विजांसह पावसाच्या जोरदार सरी कोसळण्याचा इशारा हवामान विभागानं दिला आहे.

याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.